'श्रीज्ञानेश्वरकन्यापदपांसु' वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध सत्पुरुष

श्रीगुलाबरावमहाराज

यांचे चरित्र

प्रथमावृत्ति	१९२९
द्वितीयावृत्ति	१९६२
तृतीयावृत्ति	१९६४
चतुर्थावृत्ति	२०००
पंचमावृत्ति	२००२
षष्टमावृत्ति	२००६
सप्तमावृत्ति	२००८
अष्टमावृत्ति	२००९
नवमावृत्ति	२०१६

''गीतासंवलित महाभारत जगाचा धर्म होणार आहे, असे मी भविष्य करतो.''

- श्रीगुलाबरावमहाराज

उपलब्धिस्थाने

***श्रीज्ञानेश्वर मंदिर**
दहिसाथ, अमरावती.
टे.०७१२-२६७६३०७

*** ज्ञानेश्वर संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल नागपूर

*** संत श्रीगुलाबरावमहाराज भक्तिधाम**
चांदूर बाजार, जि. अमरावती.
टे. ०७२२७-२४३१३१

***नारायण मोहोड**
ज्ञानेश्वरकन्या श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय आश्रम, आळंदी- देवाची ता. खेड जि. पुणे ४१२१०५.
मो. ९४२३००६२०८/९८२२४४०५९१

*** श्रीरंग घटाटे**
'गोकुळ' घटाटे ले-आउट, व्ही.आय.पी.रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर. ४४०००१
मो.-९३७२५२९७७०,टे.-२५२९७७०, २५३३९९७
Email : kmghatate@gmail.com

विनंती
या आवृत्तीत उपशीर्षके टाकली आहेत, त्यासंबंधी उपयुक्त सूचना कळवाव्यात ही विनंती. -कृ.मा.घटाटे



समर्पण

श्रीमहाराजांच्या प्रणतजनबुद्धिवर्धनादि
अनुपम वात्सल्यास लुब्ध होऊन
व त्यांचा वेदपुराणप्रसिद्ध चरणरजमहिमा
अन्तःकरणात भरून राहो,
अशी याचना करून
नारायण पंडितादिसमस्त मिलिंदवृंद
आपल्या लेखकादि सांप्रदायिक बंधुगणासह
प्रस्तुत चरित्ररूपी आपल्या चित्तवृत्ती
त्या मधुर चरणपंकज परागांत
समर्पण करीत आहे.

मिलिंद

चरित्र : अनुक्रम

प्रस्तावना : श्री.ल.रा.पांगारकर १
चरित्रपरिचय - 'मिलिंद' श्री.त्रिपुरवार

रज : पहिला

अवतरण प्रकरण १
नित्याची वेशभूषा ७

रज : दुसरा

पूर्वपीठिका, हस्तलेख १०
आजोबा राणोजीराव ११
दृष्टान्त १३
कुळाच्या चालीरीती १४

इ.सन १८८१

महाराजांचा जन्म १७

इ.सन १८८५

मातृ-वियोग १७
बाललीला १८
चार हाताचं लेकरूं २१
जीभेवर सरस्वती, भविष्य वाणी २२
माधान गावी २३
सर्वज्ञता २४
बाललीला व समाधी, एकपाठी २५
सावत्र आई २६
विवाह २७
विद्याव्यासंग २८
रूपचंदजी व कुर्याभाई भट २९
दिनचर्या २९
समाधीचा अभ्यास ३०
शापवाणी ३१
तितिक्षा ३२

इ.सन १८९५

काकडा गावी ३२
लग्नाची बीद, ३२
उदासीन वृत्ती, ३३
मानभावाचा मंत्र, असामान्य प्रज्ञा ३४
पितृ-वियोग ३५
विस्कळीत गृहस्थिती सोमलभक्षण ३५
रामराव मास्तर, हरिहरोपासना ३६
मानभाव, विप्रलिप्सा ३७
निबंध ४०
गोपालदासमहाराज ४१
लावणी ४२
विद्यादान ४३
विषप्रयोग ४४

इ.सन १८९८

मंत्रोपदेशाचा आरंभ ४४
देऊरवाड्यास काला, ४४
पत्नीस शिक्षण, दिनचर्या, ४५
जटाधारी बैरागी,एका कीर्तनात ४६
सौ. मनकर्णिका आई ४७

इ.सन १८९९ ते १९०३

रज ३ रा

सिरसगांव प्रकरण, गृहस्थाश्रम ४८
झाब्या कुत्रा, सद्विद्यादान ४९

इ.सन १९००

रामचंद्रबापूची गुरुसेवा ४९
पुस्तकांची पेटी ४९
वेश्येला उपदेश, स्मरणशक्ती ५०
सद्विद्याप्रसार,संस्कृतात कीर्तन,जमनाबाई ५१
शेतीवाडीचे रूपक, कौटुंबिक कहर ५२
शिवदीक्षा, विद्यादान ५३
घरातून बाहेर काढले ५३
सत्यशोधक समाज ५४

ब्राह्मण मुलांना संस्कृत शिकवू ५५
ढोंगांचा परिस्फोट ५६
इ.सन १९०१
गणपतराव अवचित,अनियमित चर्या ५७
आकाजीबापू देशमुख ५८
सौ. मनकर्णिका आई ५८
गुरु गोपालदास ५८
श्रीज्ञानेश्वरमाउलीचा अनुग्रह ६१
व्याकरणाची सूत्रे ६२
अन्याजी धोटे, काशीराव देशमुख ६३
ईश्वराविषयी प्रश्न ६७
जीवाविषयी प्रश्न ६८
इ.सन १९०२
ग्रंथसंग्रह, योगक्रिया ६९
सांप्रदायिक नांव : पांडुरंगनाथ ७०
मानभावमत समीक्षा ७०
डार्विनमत समीक्षा ७१
स्पेन्सर समीक्षा ७५
जठारांचे पत्रोत्तर ८०
ताई खोलखुटेंना अनुग्रह ८१
रामचंद्र बापू मोहोड, ८१
आकाजी देशमुख, शिष्यप्रेम ८२
पंढरपुरास, जमनाबाईस स्वप्न ८३
योगाची ११ पत्रे, गायत्री अर्थ ८४
इ.सन १९०३
मंगळसूत्र : भागवत ८७
दळणावरची गाणी : स्त्रीगीते ८७
लोणी गांवास ८८
गंडमाळा ८९
शिष्यपंचायतनातील हरिभाऊ केवले ८९
माधुर्यभक्तीचे तत्त्व ९०
यावलीस ९१
सौ. मनकर्णिका आईंचे पत्र ९१
हरिभाऊ केवलेंचे पत्र ९३
महाराजांचे उत्तर ९६
इच्छाशक्तीचे प्रयोग ९८
जनार्दनस्वामींचे पद ९९
आत्मा मेंदूचा धर्म नाही १०१
बौद्धांचा बाह्यशून्य वाद १०१
पहिली कात्यायनी (माधान१९०३) १०२
रामचंद्रभाऊंसाठी मृत्यूपत्र १०२
महाराजांचे व्यक्तिमत्व १०३
वेदमार्ग स्थापण्याची इच्छा १०३
१९०३ - १९१४
रज ४ था उमरावती प्रकरण
मधुराद्वैत मताचा उत्कर्ष १०५
माधानच्या मंडळीला शिक्षण १०६
थिऑसफीचे खंडण १०६
वासुदेवराव मुळ्यांच्या घरी १०९
मागील जन्म :
स्वामी श्रीबेचरानंद महाराज ११०
त्यांचे पूर्ववृत्त ११२
पुस्तकांचे वाचन ११४
'माझा कृष्ण भेटला' ११५
मथुरेतील राधेचा पुजारी ११५
ज्ञानेश्वरीतील नवीन ओवी ११६
इ.सन १९०४
पूर्वजन्मीच्या बैराग्यांची भेट ११७
मुसलमानी मर्से, भाजीभाकर ११७
मृत्युसमयी मार्गदर्शन (रामचंद्र मोहोड यांना) ११८
माधुर्यामृतसागरास भरती ११९

पुनर्जन्मसिध्दि १२०
पुराणांचे प्रामाण्य १२१
वेद हे ईश्वर-निर्मितच १२२
पुनर्जन्माला आधार,पंचप्राणांचा विचार १२३
खंडणाच्या तीन पद्धती १२३
नैय्यायिक व परकीयांचे खंडन १२४
मृत्यूनंतरची गती १२५
जीवाचे पंचाग्नीमार्ग १२६
त्रिविध भोग, दहरोपासना १२७
परमानंदप्राप्तीचे गुह्य तत्त्व १२९
ईश्वरप्रत्ययाचे दोन प्रकार १२९
प्रीति वृत्ति १३२
परमेश्वर जाणण्याचे ३ प्रकार १३२
पुनर्जन्माचा विचार १३४
पहिले आळंदी दर्शन **१३५**
वेदशास्त्रसंपन्न पंचभाई १३५
काशीराव देशमुख १३८
भजनसोहळा १३९
रुक्मिणी स्वयंवर १४१
तुलसीविवाह १४२
केशवपुरीचे वर्णन १४३
सर्व धर्मांचे प्रवर्तक : व्यास १४४
रामचंद्र भागवत १४५
इ.सन १९०४
२ री कात्यायनी शुक्ले.वाठोडा १४६
शिक्षण : सुसंस्कारांचे दान १४८
भूतांशी भाषण १४९
थियॉसफीवर आक्षेप १५०
विरक्तीवांचून योग १५१
अतिपरिचयात् अवज्ञा १५१
थियॉसफीचा डिप्लोमा १५१
घोंगेशास्त्र्यांची शास्त्रनिष्ठा १५२
गोपीवेश १५३
आजीची भेट १५३
बापुगडी हरदास १५४
कुंभारे बोवा १५५
पूर्वजन्म : विठ्ठलराव केंकरे
बापू गोखले ? १५९
कवित्वशक्ती १६०
शूद्र आणि वेद १६१
त्र्यंबकेश्वर व आळंदीयात्रा १६२
''पंचलतिके''चा उखाणा १६३
गंगाधर मुळे १६३
काशीराव देशमुख, १६४
बापुगडीला पश्चाताप १६५
इ.सन १९०५
गुरुवार पालखीचा आरंभ १६५
माउलीच्या पादुकांचे आळंदीस समर्पण १६५
श्रीकृष्णमूर्ति व पादुकांचे नित्यपूजनाचा आरंभ १६६
मुंबईतील चर्चा १६६
महात्म्यांच्या वागण्याची रीति १६७
नागपूर येथील हकीकत १७१
भोसल्यांकडील नारदपंचरात्र १७१
शिष्यपंचायतनातील एक
नानाजी कविमंडन १७३
नानाजींची बिमारी १७४
शिष्यपंचायतनातील
भाऊसाहेबजी खापरे १७६
पुत्रजन्म : अनंतराव १७७
बापुगडीचे पत्र १७८
काशीराव देशमुख १८०
ह.भ.प. पांगारकर १८१

उत्स्फूर्त कवित्व १८१
खापरेंना बटुरूपाने दर्शन १८३
बापुगडीला यतिरूपाने दर्शन १८४
स्वभाव वादावर चर्चा १८५
भागवतातील विषयांचा संक्षेप १८५
श्रीव्यासांचे अन्याय १८६
सौ. मायाबाईंची परीक्षा १८८

१९०६ - १९०७

पुण्यातील खटखट टाळली १९०
श्री गोंदवलेकर महाराज १९०
काशीचे कृष्णानंद सरस्वती १९१
स्त्रीवेश : स्वामींचे समाधान १९३
दोन रूपे : छिंदगाव १९५
मायबाईंचे महानिर्याण १९६
मायबाईंचे व्यक्तिमत्त्व १९७
मायबाईंना महाक्योपदेश १९८
पत्नी प्रेम पराग १९९
भूतांची भीती २००
त्रिपुरवारांचे आगमन २०१
मोक्षपट, गणपतराव अवचित २०१
लग्न मोडले, कैदेतून सुटका २०२
'मी शूद्र आहे',झोपेच्या वेळी योग २०३

इ.सन १९०७ - ०८

श्रीज्ञानेश्वर मुद्रणालय,ग्रंथलेखन २०४
काशीराम देशमुख २०४
ईश्वराचे अस्तित्व २०६
सूक्तिरत्नावली प्रथम यष्टीचे मुद्रण २०६
विष्णुपंत धामापूरकर २०६
दोन देहांचे दर्शन २०७
कधितरी हरशिल रे .. २०८
प्रियनाथ मुकर्जी २०८
नव्या शब्दांची निर्मिती २०९
अदृश्यदीपिका, कोलकात्यास २०९
जगन्नाथपुरीस, क्षेपकवाद २१०
''मायर्स'' वरील नोट्स २११
योगप्रभाव-निरूपण २११
आकाजी देशमुख २१२
सांप्रदायिकांना पार्थिवपूजा २१२
स्वरपरीक्षा २१२
भूतांचा शोध,अलौ. व्याख्यानमाला २१३

इ.सन १९०८-०९

बापुगडीचे लग्न २१३
प्रयत्न व प्रारब्धाचा वाद २१४
शिष्यपंचायतनातील प्रमुख श्री बाबाजी महाराज पंडित यांच्या सेवाव्रतास आरंभ २१६
ज्ञानेश्वर उद्धव मांढरे २१६
विष्णुपंत धामापुरकर २१७
संस्कृतातून पत्रे,स्त्रीपुरुषांचे चातुर्य २१७
स्वामी विवेकानंद २२०
दिव्य भावना, पुत्रभावना २२२
ईश्वरधर्म घेऊन उपदेश २२२
महाराजांचे आधिकारिकत्व २२३
देहबुद्धिसह पुत्रभाव अशक्य २२४
सौ. रंगुबाईची सत्त्ववृद्धी २२५
मथुरा-वृंदावन यात्रा २२६
आंधळा मुलगा, जठारांची भेट २२७
सौ. रंगुआईस रासदर्शन २२७

इ.सन १९०९-१०

तार्किक प्रश्नोत्तरे २३०
योग्यांचा देहपात : विश्लेषण २३१
भगवंताविषयी शोक २३३
स्वतःचा अपमान करून घेणे २३३

एक नैय्यायिक २३४
एक हिंदी पंडित, २३५
एका साधूची नाचक्की २३५
श्रीधरबोवा परांजपे २३६
यथार्थ स्वप्न २३७
ललित कला,पं. आदित्यराम भट्टाचार्य २३८
इ.सन १९१०-११
तत्त्वज्ञानाचे मूळ : श्रद्धामय २३९
सिद्ध व संत एकच २४०
शिष्यप्रेम २४३
इ.सन १९११-१२
श्रीधरबुवा परांजपे २४४
डॉ.परांजपेच्या घरी चर्चा २४७
फिजिक्स २५०
वर्धा : इंग्रजीत प्रश्ने : मराठीत उत्तरे २५३
अभयदान व दुर्गुणांची उपेक्षा २५४
जन्म-मीमांसा २५५
इस्लामचे हिंदुधर्माशी साम्य २५६
वेदांचे व अनेक भाषांचे ज्ञान २५६
नवीन योगसूत्रे २५७
ग्रंथाध्ययन कसे करावे २५७
इंग्रजी भाषा मंत्ररहित २५८
मराठा परिषद नागपूर २५८
'मोढ' कुलाची तपोभूमी :
माधानचे शिवमंदिर २५९
इ.सन १९१२-१३
नाट्यकलेचा उद्देश २६०
कृष्णराव रेगे, मूर्तिपूजेची सिद्धी २६१
सोहागपूरचा नैय्यायिक २६२
चार विभूविषयी प्रश्न २६३
उमाजी नायकाचे चरित्र २६३
धर्मस्थापकांची शिकवण २६५
बापुगडी हरिदास २६६
बापुगडीला उपदेश २६७
अद्वैतानुसार समतेचे लक्षण २६८
अन्य पंथ २६८
परांजप्यांच्या मंडळीचा दोष २६९
प्रेमाचे उदात्तीकरण २६९
श्रावणाची कथा २७०
हयशीर ऋषींची कथा २७३
शरीर-स्थिती व दिनचर्या २७४
महाराजांचे वर्तनाचा परिणाम २७५
न्यायशास्त्रावरील प्रश्न २७५
पुस्तकांचे वर्गीकरण,सलगीची क्षमा २७६
पाषाण्याला उपदेश २७७
महानुभावांचे महावाक्य २७७
डॉ.मुंजेंना पत्र- धर्मसुधारणा २७८
प्राचीन भौ.शास्त्रे- न्यायातून २७८
कुणबाऊ सयनाजीचे गीत २७९
१९१३-१४
सार्वजनिक धर्म-नीति शिक्षण २८०
दांभिकांसाठी प्रश्न-कदंब २८०
सांप्रदायिकाचे मुख्य कर्तव्य २८१
समन्वयाचे लक्षण आणि सबगोलंकार २८२
जैनमतातील विसंवाद २८३
आर्यांचे भौतिकशास्त्र २८५
तुकारामांचे सदेह वैकुंठगमन २८६
योगसाधना, धर्मनिष्ठा २८८
समाजातील परस्पर कलह २८९
ज्येष्ठकाका रघुजी पाटलास पत्र २९०
निवृत्तिनाथांचा दृष्टान्त २९१
नवा वेदान्ती वर्ग २९१

आर्यांचे भौतिकशास्त्र २९२
धर्मसुधारकांचा विपरीत हेतू २९२
देवासच्या राजांना पत्र-१ २९३
शब्दावरून पूर्व इतिहास २९६
देवासचे राजांना पत्र-२ २९८
चमत्कार आणि श्रद्धा २९९
देवासला गमन ३००
शंकराचार्यचरणीं विनंती ३००
विकारकालीही धर्माचे प्रतिपादन ३०१
देवास मुक्कामी ३०३
ब्रह्मविद्या ब्राह्मणांपासून आली ३०५
राजेसाहेबांकडून सेवा ३०५
देवासला मंडळीसह फोटो ३०५
सत्प्रवृत्तीची बीजे ३०७
मुंबईस सरदारगृहात ३०७
स्वजातिबांधवचरणी विनंती ३०९
गोमातेचे रक्षण, विदुरांचा अवतार ३१०
कुंटुबाने मिळून भजन करावे ३११
धर्मान्तराचे अनिष्ट परिणाम ३१२
पाराशरी होरा : गणित ३१५
घारपुरे मास्तर ३१५
कात्यायनी व्रत ३१६
श्री भटांचे प्रश्न ३१६
महाराजांची उत्तरे ३१९
पैशाची भिक्षा मागणे ३२५
शिष्याने गुरूकडे जावे ३२६
ब्राह्मणांना गायत्री मंत्रच ३२७
शब्दपरिज्ञानविद्या ३२७
कु. गोदावरी भडकमकरांचे
स्त्री-शिक्षणावर व्याख्यान ३२८
स्त्रीशिक्षण महाराजांचे भाषण ३३०
युरोपियनांकडून स्त्री शिक्षणाचा नायनाट ३३०
शिक्षणाचे यथार्थ स्वरूप ३३०
वेदान्तदृष्टीने स्त्रियांची बुद्धी ३३१
मुलींनी घरीच शिकावे, प्रश्नोत्तरे ३३३
मराठाजातीने संस्कृत शिकावे ३३३
इंग्रजी भाषा वैकृत त्यामुळे
तत्त्वज्ञानाला प्रतिबंध ३३४
वैदिक मंत्र व साबर मंत्र ३३५
मानभावांचे नियम ३३५
जितके उपासक तितकी रूपे ३३५
इस्लाम ३३६
ख्रिस्ती धर्माचे व बौद्धांचे
हिंदूधर्माशी ऐक्य ३३६
योग आणि विपर्यास ३३७
इ.सन १९१४-१५
संत बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व ३३९
अत्यंत आवडीचे अभंग ३४१
भक्तिप्रेम सुख ३४३
वेदान्त व व्यवहार ऐक्य अनिष्ट ३४३
सेठ अंबादास, यावली ३४५
जैन पंडित- वाद टाळत ३४६
संत ओळखण्याचे उपाय ३४६
सेठ अंबादासास पश्चाताप ३४७
योगविषयक पत्र ३४९
एक गोष्ट ३५१
गुरुप्रतीति, शास्त्रप्रतीति व आत्मानुभव ३५२
'घेण्याची संवय लागते' ३५३
संस्कृतात संभाषण ३५४
वेदाचा उ□ार ३५५
धर्मसंकट : पूर्वाचार्यांच्या नांवाने
वेदान्तग्रंथांचे घोटाळे ३५५

संप्रदायवेदान्त,शांकरवेदांत,वैद्यकशास्त्र ३५८
सामान्य धार्मिक तत्त्वे ३५९
तबला शिकले ३६०
अभंगांची विषयवार निवड ३६१
आख्यान निर्मिती ३६१
समस्यापूर्ति ३६१
देवापुढे चिठ्ठी ३६२
विचारस्वातंत्र्य म्ह० बुद्धिभ्रंश ३६३
शंकराचार्य व माउली- मतैक्य ३६३
महाराजां संबंधी गैरसमजुती व त्यांचा प्रतिकार ३६३
कुत्सित वाद ३६५
यक्षिणी साधन ३६६
'विवाहावांचून राहू नये' ३६६
'धर्म सुचवून मरेन' ३६७
विचार करावयास लावीत ३६७
संगीत : भातखंडेंशी वाद ३६८
ॲटम थियरी ३६९
इलेक्ट्रॉन थियरी ३७०
भातखंडेंचे उत्तर ३७२
जैनमतसमीक्षा ३७४
कात्यायनी लाखपुरी ३७६
पुराणोक्त होमाचा आरंभ ३७७
बाबा गर्दे यांचे आगमन ३७८
धर्माधिकारींचे आर्यास्तवन ३८०
श्रीमहाराजांचे उत्तर ३८१
बाबा गर्दे यांचे १ ले पत्र ३८२
महाराजांचे उत्तर १ ले ३८३
बाबा गर्दे यांचे २ रे पत्र ३८७
महाराजांचे उत्तर २ रे ३८७
रज ५ वा सुहृत् प्राप्ति
सुहृद्वर्णन, महाराजांचे बालरूप ३९३
सुहृत्प्राप्ती ३९५
शिक्षण रत्नाकर ३९६
परमार्थाचे शिक्षण ३९७
गुरूचे लक्षण ३९८
दया म्हणजे सर्वत्यागच ४००
भक्तिसुधेचे संतर्पण ४०१
वासुदेवराव मुळे ४०३
गुरुशिष्यसंबंध : आरंभ ४०४
नित्यनैमित्तिक दिनचर्या ४०६
दिवाळीचे मंगल स्नान ४०८
गाणी : स्त्रीगीते ४०९
कात्यायनीतील उत्सव चर्या ४१२
कात्यायनीची पत्रिका ४१३
ब्रह्मसत्र, कात्यायनीची सांगता ४१३
आर्येत प्रश्नोत्तरे ४१४
गोपिकोत्सव दिन : काला ४१५
जन्माष्टमी ४१७
महाशिवरात्री ४१८
मंडळींचा सत्त्वोत्कर्ष ४२०
बापुगडीला कवित्वस्फूर्ति ४२०
स्तुतिसुमनमालिका ४२१
बापुगडीला स्वप्नात अनुग्रह ४२७
स्वप्नाचा उल्लेख ४२९
बापुगडीला रासदर्शन ४२९
बापुगडीला केशवपुरीचे दर्शन ४३२
शिक्षणदशेचा आरंभ ४३३
शिकविण्याची कळकळ ४३४
शिक्षणाच्या ४ अवस्था ४३५
सत्त्वचतुष्टय ४३६
ऐश्वर्य : बाह्य व आन्तर् ४३७

आतंर् ऐश्वर्य : अष्टसिद्धी ४३८
सत्त्वोकर्षाचा मूळ पाया ४४०
धर्म म्हणजे गुरुसेवा ४४०
वृत्तिनिरीक्षण ४४४
पत्रात न छापलेला मजकूर ४४५
'मी हरलो' ४४७
चमत्कार मीमांसा ४४८
माझे शिक्षण,जुन्या युक्ती व नवी योजना ४५०
वृत्तिसंधिस्थ रस ४५०
दैवप्रयत्नाची नवी मीमांसा ४५२
श्रीकृष्णाची ऐतिहासिकता ४५४
मनोजयाचा नवा नियम ४५४
अतिवादाचे स्वरूप ४५४
शुद्धप्रज्ञा कशी उत्पन्न होते? ४५५
अभ्यास कसा करावा? ४५८
विश्वासाची आवश्यकता ४५९
वैय्यक्तिक दोषदृष्टी ४५९
सामाजिक दोषदृष्टी ४६०
शस्त्रीय दोषदृष्टी ४६०
शिष्याची सानन्यदीनता ४६१
शिष्यबुद्धिवर्धन हीच गुरुकृपा ४६२
मुनी आणि कुत्रा ४६७
संत सोनाजीबाबा, नागपूर ४६८
निरहंकार सेवा ४७१
सेवाधर्म ४७१
विदुरपत्नीचा भाव ४७६
आम्ही भावाचे पाहुणे ४७७
योग क्षेम : परमार्थाचा ४७९
बुद्धीचे तीन दोष ४७९
शिष्याच्या अन्तर्निष्ठेची परीक्षा ४८०
प्राचीन गुरुशिष्य पद्धती ४८२
वैदिक धर्मातले क्रूर गुरु ४८३
गुरुजनांची उपेक्षा ४८४
एक गोष्ट,गुरुभक्ती :साकार-निराकार ४८५
आर्यधर्मातही 'पोपरी' ४८६
महाराजांचे प्रक्रियाप्राविण्य ४८७
माझ्यातील विशेष ४८७
वृत्तिशिक्षणपद्धती ४८८
सुहृत् प्राप्तीचा उपाय ४९३
व्यवहारात समतोल तर
परमार्थात एकतानता ४९३
कामनेचे धार्मिक प्रेमात रूपातंर ४९५
वृक्षाचे रूपक ४९६
सुहत्प्राप्तीतील अवगुण ४९६
श्रीगुरूंचे जन्मकर्म अलौकिक ४९८
उपदेशाचे धोरण ४९९
महाराजांची अमोघ वाणी ५००
सुहृत् प्राप्तीचे मुख्य प्रयोजन ५०१
भक्तियोग-समाधीने ज्ञान व भक्तीची पूर्णता ५०१
सुकुमार रूप, महाराचांचे सामर्थ्य ५०२
पूर्वजन्मातील संबंध ५०३
मंडळींचा स्वार्थत्याग ५०३
शिष्यकरुणा ५०४
शिष्यांना सन्मान ५०५
श्री महाराजांचे उत्तराधिकारी
श्री बाबाजी महाराज पंडित ५०७
स्तोत्र : श्रीपांडुरंगनाथ स्तव ५१३
पद : मिलिंद-विरचित ५१४
आरती : ५१५
श्री गुलाबराव महाराजांनी केलेल्या
अखेरच्या आज्ञा ५१६
कात्यायनी व्रतांची सूची ५१७

प्रस्तावना

- कै. श्री. ल. रा. पांगारकर

१.

सत्पुरुषकथेला मोरोपंतांनी कामधेनूची उपमा दिली आहे. जो जो ज्याचा मनोरथ तो तो सत्कथा पुरविणारी आहे. अगदी अज्ञ कथापरांपासून तो रहस्यपर तज्ज्ञांपर्यंत सर्वांना तो मनोहर व बोधप्रद वाटतो.संतकथा तत्त्वज्ञानापेक्षां गूढ, इतिहासापेक्षां प्रौढ, कवितेपेक्षां रसिकजनमनोहारिणी व कादंबरीपेक्षांही उन्मादक आहे; आणि तिच्यांत तत्त्वज्ञान, इतिहास, काव्य व कादंबरी ही सर्व समु□यानें आढळतात. धर्माचें अत्यंत मोहक स्वरूप सत्कथेंत दिसतें. संत हे धर्माचें मूर्त स्वरूपच आहेत. धर्मतत्त्वाची ओळख सामान्यजनांना संतांच्या चरित्रांवरून पटते. देव आणि संत यांच्या उपदेशापेक्षाही त्यांच्या चरित्रात विलक्षण जादू असते. गीता आणि भागवत दोन्ही ग्रंथ भगवंताचेच पण त्यांतल्या त्यांत लोकांच्या प्रीतीचा कांटा गीतेपेक्षांही भागवताकडेच अधिक झुकतो! गीतेंत श्रीकृष्णांचे धर्मरहस्य व्यक्त झालेलें आहे आणि भागवतांत प्रत्यक्ष श्रीकृष्णच आहेत. अमूर्त ज्ञानापेक्षां मूर्ताची प्रीती स्वाभाविकपणे अधिक असते. या न्यायानें श्रीगुलाबराव महाराजांचे खास असे १०।१२ ग्रंथ जरी प्रसिद्ध झालेले आहेत तरी त्यांपेक्षा त्यांच्या ह्या चरित्राची गोडी रसिक भाविक प्रेमळांस अधिक वाटेल अशी मला खात्री वाटते. माझा स्वतःचा तरी हा अनुभव आहे.

२.

प्रस्तुत चरित्रग्रंथ महाराजांचे प्रियशिष्य चांद्याचे रा. राजेश्वरराव त्रिपुरवार यांनी लिहिला आहे. असा सुंदर ग्रंथ महाराजांच्या समागमामुळेंच रा. त्रिपुरवार यांस लिहितां आला. महाराजांच्या चरित्राची गोडी, संगतीमुळेंच चरित्रकाराच्या अंगी उत्पन्न झाली आणि व्युत्पन्न पंडितांच्या हातूनही जें काम होणें दुरापास्त तें गुरुभक्तीच्या योगानें साध्य झालें. महाराजांच्या चरित्रांतील गोष्टी संगतवार पण अत्यंत प्रेमवश स्थितीत त्यांनी वर्णिल्या आहेत. कदाचित् अर्वाचीन लेखनपद्धती रा. त्रिपुरवार यांस माहीत नसेल, ते मागासलेल्या प्रांतातील आहेत, त्यांची मांडणी सर्वच ठिकाणी शास्त्रशुद्ध नाहीं असेही कोणास वाटेल, पण गुरुभक्तीच्या जिव्हाळ्यानें त्यांच्या वाणीत जो सतेजपणा आला आहे, सत्संगानें धर्मरहस्याचा प्रकाश अंतर्यामी पडल्यामुळे त्यांत निःसंदेहतेचा जो आवेश आहे, स्वतः पाहिलेल्या अनुभवलेल्या, व विश्वसनीय पुरुषांच्या तोंडून ऐकलेल्या अनेक गोष्टी त्यांत ज्या अनुपम प्रेमानें वर्णिल्या आहेत, त्यांचा विचार करितां, हा ग्रंथ बहुतांशी प्रासादिक

उतरला आहे असे म्हणण्याचा मला मोह पडतो !

रा. त्रिपुरवार यांची गुरुभक्ती डोळस आहे की अंध आहे असें मी कसे म्हणूं? मला डोळसभक्ति आणि अंधभक्ति यांतला भेदत कळत नाही. अंधभक्ति हा शब्द अर्वाचीन दिसतो, व तो बहुधा ज्यांना भक्तीची ओळख नसते त्यांच्या परिभाषेंतला असावा. डोळसपणा शिवाय भक्तिच कशी उत्पन्न होईल! ती खरोखरीची उत्पन्न झाल्यावर अगदीं क्षुल्लक बाबींकडे लक्षच जाईनासें झाल्यामुळें तिला अंधभक्ति असे नांव पाहिजे तर द्यावें, पण मी तरी तिला निष्ठा, विश्वास, दृढश्रद्धा, प्रीति असेंच म्हणतों. आणि भक्ति अशी अंध न होईल तर तिचें भक्तित्वच कोठें राहिले? गोपींची श्रीकृष्णावर जी अलोट भक्ति होती ती डोळस होती कां अंध होती?

मी तर डोळस भक्तीची परिपूर्णता म्हणजेच अंधभक्ति असें समजतो. डोळसभक्ति=अंधभक्ति=निष्ठा असें मी गणित करितो. पूर्णातून पूर्ण काढून घेतलें म्हणजे पूर्णच बाकी उरते (पूर्णमेवावशिष्यते) हा हिशेब एखादा गणिती चुकीचा समजेल तर समजो, पण हें गणित श्रुतिमाउलीनें केलें आहे. अध्यात्माचे हिशेब अध्यात्माच्या गणितपद्धतीनेंच पाहिले पाहिजेत. असो.

त्रिपुरवार यांचा हा ग्रंथ उत्कट गुरुभक्तीने अत्यंत प्रेमळ झाला आहे. थोरांच्या लहान लहान गोष्टीही मोठ्या चित्तवेधक असतात आणि चरित्रकार त्यांचा संग्रह न करील तर त्याचें ते चरित्र फिकेच होईल. थोरांचा थोरपणा त्यांच्या लहान लहान गोष्टींतूनही लोपत नाही. थोर ते सर्वांगानें सर्वकाळीं थोरच असतात. संप्रदायाबाहेरचे किंवा परमार्थानभिज्ञ लोक काय म्हणतील, याचा विचार न करिता गुलाबराव महाराजांच्या सर्व लहान मोठ्या गोष्टींचा रा. त्रिपुरवार यांनी यांत संग्रह केला आहे आणि म्हणूनच -

महाराज 'जसे होते तसेच' या चरित्रांत दिसतात. शिष्यांशी विद्वानांशी, खेडवळांशी, नास्तिकांशी व प्रेमळांशी महाराज जसे वागले व जें जें बोलले तें तें प्रामाणिकपणानें यांत ग्रथित केलें आहे, आणि म्हणून या चरित्राच्या सत्यत्वाविषयीं शंका घेण्यास जागा राहिली नाहीं. महाराजांचा लहरी व स्वच्छंदी स्वभाव, महाराजांचा तापटपणा, या ग्रंथांत जसा तो मूळ स्वभावांत दृष्टीस पडे, तसाच दाखविला आहे! 'क्रोधोपि निर्मलधियां रमणीय एव' असेंच असल्या पुरुषांच्या कथा पाहिल्या म्हणजे वाटते. महाराजांच्या चरित्रांत त्यांच्या पूर्वार्जित अत्युत्कट श्रीकृष्णभक्तीचा जो प्रचंड झोत सूर्यप्रकाशासारखा निरंतर तळपत असे त्यामुळें त्यांच्या माहात्म्याविषयीं कोणाचीही संगतीनें खात्री पटत असे. प्रकृतिगत गुणदोषांचा विचार गौण आहे, जीवात्म्याची योग्यता काय होती हा मुख्य विचार आहे; आणि

या दृष्टीनें पाहतां गुलाबराव महाराज हे 'योगभ्रष्टोऽभिजायते' या उ□ा कोटीची विभूति होती या विषयी शंका उरत नाही. हे समग्र चरित्र दुरभिमान सोडून जो कोणी वाचील त्याचीही अशीच खात्री झाल्याशिवाय रहाणार नाही.

३.

इ.स. १९०६ साली मी उमरावतीस होतों तेव्हांपासून श्रीगुलाबरावमहाराजांचा सहवास मला पुष्कळ झाला. त्यांच्या संगतीत होणारा आनंद रा. त्रिपुरवार यांनी वर्णन केला आहे तो सर्व यथार्थ आहे.

''महाराज बोलूं लागले कीं भक्तिप्रेमामृताचा नुस्ता पाऊस पडे, ते चर्चा करून लागले कीं त्यांची निर्दोष वादसरणी, विलक्षण ज्ञान व युक्तिवाद पाहून मन कुंठित होई, ते प्रेमाने गाऊं लागले कीं मुलाच्या माधुर्यालाही लाजविणारी त्यांची अत्यंत मधुरवाणी ऐकून चित्त नागासारखे डोलूं लागे. पूजादि कर्मे ते इतक्या सशास्त्र रीतीने व सद्भावानें तासचे तास करीत कीं ती त्यांची कर्मनिष्ठा पाहून कर्मठालाही धन्यता वाटे. कर्मज्ञान उपासना या तीनही बाबतीत त्यांचे अंतःकरण व आचरण इतकें बिनतोड असून अव्याज मनोहर होते की ही साधुमूर्ति लोकांना मार्ग दाखविण्यासाठीच अवतरली आहे असे भाविकाच्याच काय पण सुबुद्ध तार्किकाच्याही मनाला वाटे.

ते आस्तिकाशीं व नास्तिकाशी निर्विकारपणे वाद करायला हवे तेव्हां सिद्ध असत, पण कोणी छलबुद्धीनें, परीक्षा पाहण्याच्या हेतूनें कांही कपट मनांत धरून आला कीं ते तत्काळ ओळखीत व मग आपल्या हृदयातली सारी कोमलता आच्छन्न करीत व त्यांशी अशा रीतीनें बोलत की त्यांच्या स्वतःविषयीं अनादर व्हावा! पुण्यांतील कित्येक विद्वानांना त्यांनी अशाच रीतीने धुडकावून लावलें व हें ते एकदा मजपाशीं स्पष्ट बोललेही होते.

गोपाळराव आगरकरांसारखा ऋजुस्वभाव सुधारकवीर व नास्तिक पण हाडाचा सज्जन पुरुष त्यांच्या सहवासांत येता तर त्यांनी त्याला स्वधर्माचें वेड लावलें असतें असें उभयतांची मला माहिती असल्यामुळें वाटतें.

युक्तिवादांत व माहितीच्या बाजूनें त्यांनी टिळक समोर येते तर त्यांनाही हार खायला लावली असती, याविषयीं मला तरी शंका वाटत नाहीं. टिळकही लोकोत्तर बुद्धिमत्तेचे व स्वच्छ अंतःकरणाचे पुरुष आहेत, पण गुलाबराव महाराजांपाशीं परोक्षाच्या पलीकडचें कांही होतें त्यामुळें त्यांची छाप अधिक पडली असती. तें त्यांना पूर्वजन्मीच्या तपोबळाने प्राप्त झालेलें असों, दृढतर उपासनाबळानें सिद्ध झालेले असो किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें मिळालेलें असो.

अव्यंग कर्म, विशुद्ध ज्ञान, अलोट भक्ति ह्या तिहींचे एकीकरण सत्पुरुषांवाचून अन्यत्र कोठेंही दिसत नाही, तें महाराजांत होतेंच, पण याशिवाय अर्वाचीन चिकित्सक दृष्टीलाही ज्याचा उलगडा होत नाही अशा कित्येक गूढ (मिस्टिक) गोष्टी त्यांजजवळ होत्या. त्यांच्या सहवासानें ही एक लोकोत्तर विभूति आहे असें कोणाही पूर्वग्रहविमुक्त पुरुषास कबूल करावें लागे.

४.

उमरावतीस असताना मी कात्यायनीव्रताच्या समाप्तीसाठी महाराजांच्या दर्शनास गेलों तो भेटीचा पहिला प्रसंग. (पृ. २११-२१३) बरोबर १०/१५ माणसें होतीं. प्रत्येकाची नाडी पाहून हे 'कोण' असें ते विचारीत व कोणी तरी नांव सांगे. असें होतां होतां मध्येंच कोठे तरी मी आलों, पण माझ्या नाडीवर बोटें ठेवतांच 'हे पांगारकर' असें म्हणून त्यांनी मला बाहेर काढले. मी यानंतर 'महाराज! आपणास नाडीत पांगारकर कसा सांपडला?' असें एकदां विचारलें तेव्हां उत्तर काहींच केलें नाहीं, 'मी चुकलों तर नाहीं' एवढेच म्हणून हंसले. महाराजांची या प्रथम भेटीपासून मजवर अखेरपर्यंत अत्यंत ममता असे.

दुसरे दिवशी हवनानंतर माझा हात धरून त्यांनी मला लांब एका हेमाडपंती देवळांत नेले. बरोबर ४०/५० माणसें होती. आंत शिरतांच मला म्हणाले, 'तुम्ही द्याल त्या विषयावर आज तुम्हाला पुराण ऐकवायचें आहे.'

मी 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला' ही ज्ञानेश्वरीतील ओवी म्हणालो. त्यावर त्यांनी तत्काळ स्वरचित हजार ओव्यांत निरूपण केलें. दुसरे दिवशींही दुसऱ्या एका ओवीवर ८०० ओव्यांचे निरूपण केले. ओवी प्रौढ व प्रासादिक. सर्व अर्वाचीन कवी यांच्या पायांवर घालावे असें मला तत्काळ वाटलें.

ज्ञानेश्वरमहाराज हे तात, श्रीकृष्ण (वासुदेव नामक) हे पति व आपण गोपी अशी यांचा उपासना पाहून कित्येक नवीनांस आश्चर्य वाटलें, तथापि त्यांच्या अत्युत्कट भक्तिप्रेमाचा जिव्हाळा पाहून मी त्यांतच दंग झालो. भोजनप्रसंगाचा आनंदही अनुपम होता. मी श्लोक म्हणावा व त्याचें त्यांनी तत्काळ व त्याच वृत्तांत रचलेल्या श्लोकाने उत्तर द्यावें असें सारखें चालले होतें. ती अद्भुत काव्यशक्ति, ती पराकाष्ठेची मधुरवाणी, ती अलोट कृष्णभक्ति, तो नांव घेण्याचा अपूर्व समारंभ- या सर्वांनी माझें मन मोहून गेलें. देवाच्या दयेनें मला सत्संगति आणिकही घडली आहे, पण गुलाबराव महाराजांच्या संगतींत जो 'अद्भुतं रोमहर्षणं' असा

भक्तिप्रेमानंद भोगायला सांपडला तसा मात्र अन्यत्र कोठेंही मिळाला नाही. ते नुस्ता 'ज्ञानेश्वर माउली' अशा साध्या नाममंत्राचा पूजापुराणोत्तर जो मंजुळ घोष करीत तो अजून माझ्या कानांत घुमत असतो, इतकें मधुर नामस्मरणही कोठें ऐकायला मिळायचें नाही. गेल्या आठवड्यांत गोभक्त चौंडे महाराज यांच्याशीं माझे भाषण चालले असतां त्यांच्याही तोंडून असेच उद्गार निघाले.

५.

महाराजांच्या संगतींत जे प्रकार पाहिले त्यासंबंधाने वेळोवेळी मी आपल्या 'मुमुक्षूं'त लेख लिहिले आहेत व त्यांतील अवतरणेंही ह्या ग्रंथांत उद्धृत केलेलीं वाचकांस आढळतील. सबब त्यांची पुनरुक्ति न करितां कित्येक अनुभवाच्या आठवणी येथें नवीनच देतों.

महाराज नंतर उमरावतीस आले तेव्हां त्यांचा समागम ८।१५ दिवस पुन्हां झाला. एके दिवशी माझे बिऱ्हाडीं महाराज व मी बोलत बसलों असतांना श्री. दादासाहेब खापर्डे यांजकडील बोलावणें आल्यावरून आम्हीं त्यांजकडे गेलों. नित्याप्रमाणे दादासाहेबांच्या भोंवती ५।५० मंडळी बसली होती. 'मेल्यावर जीवाचे काय होतें? तो कोठें जातो?' असा त्यांनी प्रश्न केला. त्यावर महाराजांनी यावर थिऑसफींचे मत काय आहे व आपल्या धार्माचे सिद्धांत काय आहेत हे सप्रमाण सांगितले. सर्व भाषण ऐकून खापर्डे आश्चर्यचकित झाले व ''ओ, ही इज एटलीस्ट ॲन इंटलेक्च्युअल फिनॉमिना'' असे उद्गारले. महाराजांचे मॅडम ब्लॅव्हाट्स्कीबद्दल अनुकूल मत होतें, पण बेझंटबाईविषयी तसे नव्हतें. याविषयी त्यांचे माझ्याशीं अनेकवार बोलणें झाले आहे. थिऑसफीविषयीं त्यांचा ग्रह अनुकूल नव्हता.

६.

* इ.स.१९११।१२ साली महाराज आळंदीस जाण्याकरितां पुण्यास आले तेव्हां चार दिवस त्यांचा माझे बिऱ्हाडीं मुक्काम होता. बरोबर ४।५ मंडळी होती. एके रात्रीं गोष्टी सांगत आम्ही निजायचे तयारीत होतों तों तेथे एक सर्प आला. महाराज डगमगले नाहींतच, पण त्यांनी कोणासही त्याला मारूं दिलें नाहीं.

* दुसरे दिवशीं आम्ही सर्व आळंदीस गेलों. तेथें ज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुकांना पंचामृतस्नान घालून महाराजांनी पूजा बांधली. स्नानविधि चालला असतांना माझ्या हातांतील सल्ले पादुकावर किंचित् खरखरले. तो ध्वनि इतका सूक्ष्म होता कीं त्यांच्याशिवाय कोणाला ऐकू आलाच नाहीं, तथापि तो कानावर पडतांच त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले व 'महाराजांच्या पायाला तुमचे सल्ले बोचतात म्हणून ते स्नान संपेतों काढून ठेवा' असें त्यांनी मला सांगितले.

उपास्याविषयीं उपासकाच्या मनाची किती कोमलता असते व असायला पाहिजे हें मला ह्याप्रसंगी समजून आनंद वाटला.

* सायंकाळी तेथील वाचनालयांत ज्ञानेश्वरमहाराजांनी जिवंत समाधि कां कशी घेतली यांचे त्यांनी योगशास्त्रांतील अनेक वचने सांगून दीड तास निरूपण केलें, ते बहुधा त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणासही समजलें नाही!

* तिसरे दिवशी तळेगांवची कांचशाळा पाहून येण्याची महाराजांना इच्छा झाल्यावरून आम्ही तेथें गेलों. तेथील विद्यार्थ्यांनी महाराजांचा सप्रेम सत्कार केला व 'आम्हांला कांही परमार्थ सांगा' असें म्हणाले.

त्यावर महाराजांनी उत्तर केलें, 'रोज १०८ वेळां ज्ञानेश्वरमाउली एवढ्याच नाममंत्राचा जप करायचा असा निश्चय करून त्याप्रमाणें जो वर्षभर वागेल त्याला मी पुढच्या वर्षी सांगेन. उगीच चावटी करण्यांत मतलब काय?'

* यानंतर कांच तयार करण्यास अवश्य लागणारा क□ा मसाला जमीनींत कसा कोठे शोधावा यावर ते वराहमिहिरादि प्राचीन ग्रंथकारांच्या आधारें दीड तास बोलले! तळेगांवांहून परत येतांना वाटेंत गाडींत ४।२ लावण्याही त्यांनी मजेनें म्हणून दाखाविल्या.

* चौथे दिवशीं स्नानाला पाणी उपसले होतें, चार दोन स्वयंसेवक पाणी देण्यात गुंतले होते, दर्शनास आलेल्या शेंपन्नास लोकांचा भोंवती गराडा पडला होता. अशा वेळी मी महाराजांस सहज प्रश्न केला की 'आपल्या अध्यात्माच्या तोंडीचे पाश्चात्य तत्वज्ञानांत काय आहे?'

यावर त्यांनी प्लेटो, साक्रेटीस, डिसकार्टेस, कँट, हेगेल, स्पेन्सर, मिल्ल इ. अनेक तत्वज्ञान्यांच्या ग्रंथाचे विहंगम दृष्ट्या विवेचन करून म्हटलें की ''कोणी कोणी लांबून चांचपडणारे सांपडतात, पण सूर्यप्रकाशासारखें आत्मज्ञान स्वच्छ झालेले महात्मे भरतखंडांतच उपजले आहेत.प्लोटिनस ख्तदड्डतथि हा काहींसा जवळ जवळ गेलेला दिसतो''

कोणी लघुलिपी लेखक जवळ असता तर कोण बहार झाली असती? पाश्चात्य तत्त्वज्ञानावर इतकें उत्कृष्ट व्याख्यान देणारा प्रोफेसर कोणत्याही कॉलेजात मिळायचा नाही असे उद्गार श्रोत्यांच्या तोंडून निघाल्यास नवल काय?

ह्या चारही दिवसांत माझ्या 'मोरोपंताचें चरित्र व काव्यविवेचन' ह्या ग्रंथाचीं बहुतेक प्रकरणें महाराजांनी वाचवून ऐकिली व ग्रंथासंबंधाने अत्यंत प्रशंसापर उद्गार काढले. याप्रमाणें चार अहोरात्र महाराजांच्या संगतीत ज्ञानानंदांत गेले.

७.

पुन्हां इ.स.१९१३ साली मुंबईच्या सरदारगृहांत मला महाराजांचा सहवास १८ दिवस झाला (पृ. २६२). ह्या प्रसंगाचें वर्णन मी मुमुक्षूच्या ता. २।१०।१३ च्या अंकांत दिलें असून त्यांचे अवतरण ह्या ग्रंथांत पृ. २६५।२६६ मध्यें आलें आहे. त्यांत न आलेल्या १।२ गोष्टी येथें सांगतों.

* मुंबईस 'रॉयल एशिआटिक सोसायटी'ची 'मुंबईची शाखा' नांवाचें एक सुप्रसिद्ध ग्रंथसंग्रहालय आहे. तें पाहण्याची महाराजांस इच्छा झाली. महाराज, मी व त्यांचे दोन शिष्य असे चौघेजण ही संस्था पाहण्यास गेलों. तेथें आधुनिक कवि मोगरे यांची गाठ घेऊन मी त्यांस महाराजांची संक्षिप्त माहिती सांगितली. पण त्यांस कांही विशेष आदर न वाटतां एका कारकुनास संग्रहालय दाखविण्यास सांगून ते आपल्या कामास गेले.

संग्रहालय बराच वेळ पाहिल्यावर 'येथें संस्कृत हस्तलिखित ग्रंथ कोठे आहेत ते मला दाखवा' असें महाराज म्हणाले व आम्ही एका विस्तृत खोलींत गेलों. संस्कृत हस्तलिखित ग्रंथांचे नोंदबुक मी आपल्या हातीं घेतलें व क्रमाने एकेक नांव वांचूं लागलो. ग्रंथाचें नांव वाचल्याबरोबर हा ग्रंथ कोणी लिहिला, हा जैनांचा आहे कां बुद्धांचा आहे, न्यायशास्त्राचा आहे कां वैशेषिकांचा आहे हे सर्व माहित असल्याप्रमाणे महाराज बिनचूक सांगूं लागले व ही यादी तयार करणाऱ्यानें कशा चुका केल्या आहेत तें त्यांनी दाखवून दिलें. याच समयास रा. मोगरे जवळच उभे राहून हे सर्व ऐकत होते तेही महाराजांचे बोलणे ऐकूण आश्चर्यचकित झाले व निरोप देतांना 'बुवा अत्यंत विद्वान् दिसतात' असें म्हणाले. मी लगेच उत्तर केलें, 'बोवा शूद्र व बालांध आहेत हें लक्षांत आणा म्हणजे त्यांची विद्वत्ता एका जन्मांतली नाहीं हे आपल्यास उमगेल'

* तसेंच सरदारगृहांत एके रात्रीं एक गृहस्थ महाराजांचे दर्शनास रात्री ११ चे सुमारास आला. तो दारांतून दोन वाक्यें बोलला तोंच महाराज म्हणाले, 'हा इसम दारू पिणारा आहे. याला हाकून द्या.'

तो गेल्यावर मी म्हणालों 'हा दारू पिणारा आहे हे आपणांस इतक्या अंतरावरून कसें कळलें?'

महाराज म्हणाले, 'त्याच्या आवाजवरून'. महाराजांचे अंतरिंद्रिय किती सूक्ष्म होतें हे ध्यानांत येऊन मला आश्चर्य वाटले. सत्पुरुषाची सर्व ज्ञानेंदियें अत्यंत सूक्ष्म असतात व म्हणून सामान्यतः स्थूल जीवांना अगम्य अशा अनेक गोष्टी त्यांना सहज गम्य होतात. पुष्कळ चमत्कारांचे बीज याच गोष्टीत आहे.

महाराजांच्या माझ्या खाजगी बैठकींत उपासना, पूर्वजन्म इ. संबंधाने

पुष्कळ गोष्टी झाल्या पण त्या उघड सांगणें प्रशस्त वाटत नाही.

यानंतर ता. १४।११।१९१३ रोजीं मी महाराजांस एक पत्र पाठविलें. त्यात प्रथम पुढील दोन आर्या लिहिलेल्या माझे रोजनिशींत सांपडल्या :-

आर्या

नमितों सद्भावें मी प्रथित श्रीमत् गुलाबरायातें ।
नारायणपदपद्मी सुप्रेमा दाविला बरा यातें ॥१॥
श्रीराधारमणाच्या विश्वस्तुत चरणकमलिंचा भृंग ।
यद्वैराग्य स्मरवी दशरथजामात विप्र तो शृंग ॥२॥

८.

रा. त्रिपुरवार यांनी प्रेमाग्रहाने या चार ओळी लिहिण्याची मला संधि दिली याबद्दल त्यांचे आभार मानून पुरें करितों.

- लक्ष्मण रामचंद्र पांगारकर पुणें, मुमुक्षु कचेरी , पुणे.

श्रीकृष्णजन्माष्टमी, शके १८४१ / इ.स.१९१९

(पहिली आवृत्ती)

श्री बाबाजीमहाराज पंडितांनी केलेले

रूपवर्णन

पुण्यवृक्ष आजि फळलासे माझा ।
माय ज्ञानेशजा देखियेली ॥
अरुणप्रभेची ओतोनिया मूस ।
रेखिले सुरस पादपद्म ॥
कर्दळीच्या स्तंभासम जानुजंघा ।
मृदुल सुरंगा शोभताती ॥
कटिं पीतांबर उदरी त्रिवळी ।
कुंकुमरेखा भाळी शोभतसे ॥
सरळ नासिक सुहास्य वदन ।
माथां कृष्णवर्ण वेणी शोभे ॥
पांडुरंगनाथ सर्वांग सुंदर ।
हृदय मंदिर शोभवीतु ॥

॥ गाथा : अभंग ५ वा ॥

चरित्र परिचय

- 'मिलिंद' श्री.राजेश्वरशास्त्री त्रिपुरवार

तस्मात्सर्वप्रयत्नेन मत्प्रियां शरणं व्रजेत् ।
आश्रित्य मत्प्रियां रुद्र मां वशीकर्तुमर्हसि ॥

(पद्मपुराण- पातालखण्ड)

प्रयत्न आणि प्रेम या दोन दिव्य चक्रांच्या रथांत आरूढ होऊन जीवांनी नराचा नारायण बनावे हें अनादि श्रुतिसंतांच्या उपदेशाचें बीज आहे. ''यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः'' हें सातशें श्लोकांचे सारभूत तत्त्व जें श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या हातीं दिलें त्याचाही अभिप्राय हाच आहे. अगदीं जंगली स्थितीतल्या अडाणी मनुष्यापासून विद्यादेवीच्या साम्राज्यांत वावरणाऱ्या विद्वानापर्यंत सगळे आपआपले व्यवसाय या दोनच तत्त्वांवर यशस्वी करूं पहात असतात. प्रापंचिक जनांची, आपला संसार सुखसमाधानानें करण्याची खटपट, समाजसुधारकांची कळकळीची समाजसेवा, थोर पुरुषांचे देशकार्यार्थ निःशेष स्वार्थत्यागाचे उद्योग हे सगळे प्रयत्न आणि प्रेम यांच्या आधारावर चाललेले असतात. पंचमहाभूतांस आपल्या अंकित करूं पाहणाऱ्या अचाट विश्वशोधकांचीही स्थिति ह्याच आधारावर असते. देवादिकांचे स्वर्गभोग, दैत्यांचे पातालांतील ऐश्वर्य, प्रयत्न आणि प्रेम ह्यांच्याच बलावर संपादलेले आहेत. सारांश, भौतिक किंवा दैवी कोणत्याही प्रकारचा अभ्युदय संपादन केला जातो तो ह्या दोघांच्याच बळावर.

आतां तिसरा जो आध्यात्मिक अभ्युदय किंवा निःश्रेयस सिद्धि तिच्याकडे जर या चक्रांची गती वळवली तर कल्पनातीत सुखसर्वस्वाची कशी प्राप्ति होते याविषयीं संपूर्ण उपनिषदादि भाग व योगवासिष्ठासारखे ग्रंथ अत्यंत प्रमाणभूत होऊन बसले आहेत व युगीं युगीं अवतरणाऱ्या संतमंडळाची चरित्रें त्याविषयीं आदर्शभूत आहेत. त्या सर्वांचे सारभूत तत्त्व पाहिलें असतां सत्संग व प्रणिपात, परिप्रश्न आणि परिसेवा हे प्रपत्तित्रयपूर्वक सद्गुरुसेवन हेंच सर्व धर्माचें, सर्व प्रयत्नाचे व सर्व प्रेमाचें आद्यमूळ होय असें दिसून येतें, व आरंभी दिलेले

पद्मपुराणांतील भगवद्वचनचही याच तत्त्वाचे कंठरवाने प्रतिपादन करीत आहे.

नाथ संप्रदायांतील संतमंडळाच्या चरित्रांकडे जरा सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें तर, त्यांच्या आचरणांत भक्तिज्ञानवैराग्याचें मूर्तिमंत स्वरूप, त्यांच्या हृदयांत करुणामृताचा अखंड निर्झर, त्यांच्या चित्तांत व्रजगोपिकांचे माधुर्यप्रेम, त्यांच्या वाणींत भाविकांचे प्रतिबंध दूर करून त्यांचे कोटकल्याण करणारी वेदाची मंत्रशक्ति व त्यांच्या उपदेशांत प्रेम आणि प्रयत्न यांची योग्य दिशा दाखवून साधकास हळु हळु बुद्धियोगाच्या भूमिकेवर चढविणारी शास्त्रीय, पद्धतशीर व सुसंगत शिक्षणपद्धति, इत्याद्यनेक गोष्टींचा अपूर्व मिलाफ दृष्टीस पडतो.

वऱ्हाडांतील अलौकिक संतविभूति श्री गुलाबराव महाराज हे नाथपरंपरेंतले असून त्यांचे चरित्र वरील योग्यतेचें असल्यामुळें त्याचा हा पूर्वखंड आज आम्ही प्रेमळ वाचकवृंदास सादर करीत आहोंत. प्रेम आणि प्रयत्नविषयक शिक्षण महाराजांच्या चरित्रांत किती कळकळीचे व प्रबल स्फूर्तिदायक भरलेलें आहे याची कल्पना पुढें दिलेल्या त्यांच्या हिंदी पद्यांवरून सहज करता येतें. तीं पद्यें अशीं :-

(सवैया)

सद्गुरु की करुणा मन केवल राखि अयत्नन वृत्ति फले है ।
यत्नहिते जन कर्म करे अरु यत्नहिते मुनि ब्रह्म मिले है ।
यत्नहिते बनि आवत साधन यत्नहितें गुरुग्यान खुले है ।
यत्न बिचार सहाय करे अरु यत्नहितें श्रुतिबाग फुले है ।
जो न बनीहि बनावत है हरि के बिन सत्यवती हरिमाया ।
फेरि प्रयत्नहि एक समर्थ न कारजकारि दुजा कोई पाया ।
यत्नहिते बर दैवत दे अरु यत्नहिते मुनिशाप न लागे ।
यत्नहिते बलि काल हटे अरु यत्नहिते चितिमे मति जागे ॥
कोउको जीव भया जगमें निज यत्नहिते गिरिजापति शंभू ।
कोउको जीव भया निज यत्नहिते हरि कोउ को जीव स्वयंभू ।
यत्नहिते चिरजीवन लब्ध भुशुंड मुनी करि कंचन काया ।
ब्याज करी रघुनंदन की निजग्रंथ वसिष्ठजु यत्नहि गाया ॥

वस्तुतः श्रीमहाराजांचे चरित्र - त्या दीनवत्सल सद्गुरुमाउलीचें चरित्र त्यांची दिव्य जन्मकर्मे, श्रुती शेषासही अतर्क्य होत. अशा चरित्राचें यथार्थ वर्णन लेखकासारख्या मंदबुद्धि पामरास अत्यंत अगम्य असूनहि केवळ प्रेमाच्या आवडीसाठीं त्यानें हा एक मूढ प्रयत्न केला आहे व ह्याच दृष्टीनें आपल्या कृतीला त्यानें ''श्रीज्ञानेश्वरकन्यापदपांसु'' हे नांव देऊन नऊ भागांत महाराजांचे चरित्र अल्पमतीनें वर्णन केले आहे. प्रत्येक भागाला 'रज' ही संज्ञा आहे.

प्रथम रजांत (अवतरण प्रकरणांत) महाराजांच्या मधुराद्वैतमताचें दिग्दर्शन करून, दुसऱ्या तिसऱ्या व चवथ्या रजांत (माधान - सिरसगांव व उमरावती या प्रकरणांत) महाराजांच्या जन्मापासून त्यांच्या एकंदर चरित्राचा ऐतिहासिक भाग गोवलेला आहे. हे चार रज मिळून चरित्राचा पूर्वखंड झालेला आहे.

पाचव्या रजात (सुहृत्प्राप्ति प्रकरणांत) भाविकांस परमार्थशिक्षण देऊन महाराजांनी त्यांच्या उन्नतीचा जो प्रयत्न केला त्यांचे वर्णन आहे.

सहाव्या रजांत (अलोक प्रकरणांत) महाराजांच्या अलौकिक शक्तीचें किंवा योगसामर्थ्याचें सोपपत्तिक दिग्दर्शन असून केवळ आपल्या भक्तांचे प्रतिबंध दूर करण्यांतच त्यांनी आपलें योगसामर्थ्य कसें खर्च केले याचें वर्णन आहे.

सातव्या रंजात (वाङ्मय प्रकरणांत) महाराजांच्या वेदतुल्य दिव्यवाणींतून मधुराद्वैत शास्त्राचा उपदेश किती साहजिकपणें प्रगट झाला ह्यांचे दिग्दर्शन आहे.

आठव्या रजांत (स्वभाव विवेचन प्रकरणांत) ''सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः'' या उत्तम भागवत लक्षणाप्रमाणें स्तुति करणारे व निंदा करणारे, भक्त व अभक्त, संप्रदायप्रविष्ट व संप्रदायबाह्य, भाविक व अभाविक ह्या सर्व प्रकारच्या जनांशी अधिकानुरूप वागणूक ठेवून आपली समबुद्धि न ढळूं देतां मधुराद्वैत प्रसारांचे कार्य महाराजांनी कसे केलें तें दाखविलें आहे व अंतिम रजांत (उपसंहार प्रकरणांत) सद्गुरुरूपानें महाराजांचे वात्सल्य व्यक्त करून त्यांच्या चरणीं ह्या अल्प कृतींचे समर्पण केलें आहे. हे पांच रज किंवा प्रकरणें (५ ते ९) मिळून चरित्राचा उत्तर खंड व्हावयाचा आहे.

ही कृति श्री महाराजांच्या करुणासावलींत सुरू होऊन बराच भाग

त्यांस वाचून दाखविला गेला आहे व महाराजांच्या वात्सल्यप्रेमजीवनाने त्या कृतीचें सर्वतोपरी पोषण झालें आहे, होत आहे व होणार आहे. चरित्राची माहिती सांगणारे, लेखनकार्यास मदत करणारे, परोपरीने लेखन साहित्य पुरवून व लेखकाचे संगोपन करून त्याला प्रोत्साहन देणारे, मुद्रणार्थ द्रव्यसहाय देऊन चरित्र प्रकाशनास हातभार लावणारे इत्यादि विविध द्वारांनी- महाराजांच्या अनंत हस्तांनी- प्रेमजीवन मिळून प्रस्तुतचें हे पूर्वखंडरूपी मधुर फल पाडास आलेलें आहे. भाविकजन त्यांचे सेवन करू लागतात तोंच उत्तरखंडही त्यांना लवकरच सादर करण्याचा विचार आहे व त्यांचे पहिलें सुत्दृत्प्राप्ति प्रकरण यापूर्वीच छापून वाचकांच्या अवलोकनार्थ गेलेंही आहे. बाकीची चार प्रकरणेंही लवकरच तयार होतील. चरित्राचा हा उत्तरखंड वाङ्मयप्रधान - विशेष विचार प्रधान - असल्यामुळें प्रगमनशील अशा पारमार्थिक जिज्ञासू जनांस अनेक दृष्टींनी उपकारक व मनोरंजक आहे. याकरितां प्रेमळ भाविकांनी पूर्वखंडास आश्रय देऊन उत्तर खंड लवकर मुद्रित करण्यास उत्तेजन द्यावें एवढीच प्रार्थना आहे.

चरित्र लिहिण्यास आरंभ केल्यापासून तें छापून प्रसिद्ध होत पावेतों संप्रदायबंधूंचे व प्रेमळ धार्मिक सज्जनांचे सर्वप्रकारें सहाय झालेलें आहे. गुरुस्थानीं पूज्य असलेले श्रीबाबाजी महाराज, हरिभाऊ केवले, दत्तोपंत खापरे, व्यंकटराव देशपांडे, नानाजी कविमंडन, रा. रा. लक्ष्मणराव सराफ (परलोकवासी), रा. रा. तात्याजी कविमंडन यांनी वेळोवेळी साह्य केलें, रा. रा. वासुदेवराव मुळे यांनी कार्याचें महत्व ओळखून लेखन सामुग्रीसहित साहित्य पुरविलें व लेखकाची सर्वतोपरी व्यवस्था ठेविली, वेदशासंपन्न श्रीनिवासशास्त्री हरिदास यांनी अनेक प्रकारें मनःपूर्वक उत्तेजन दिलें, रा. रा. विठ्ठलराव केंकरे, निळकंठराव काठीकर, रामचंद्र गंगाधर भागवत यांनी स्वानुभव प्रेमपूर्वक लिहून पाठविले, रा. रा. काशीराव बापूजी देशमुख यांनी आपला अमोल वेळ खर्च करून स्वतः विषयीची आद्योपान्त हकीकत लिहून पाठविली, मुद्रण कार्यारंभी चांद्याचे श्रीगणेशभक्तिपरायण दाजीसाहेब देवईकार वकील यांनी सर्वांच्या अगोदर लेखकांचे अभिनंदन करून व सक्रिय सहानुभूति दाखवून निर्विघ्नतासूचक मंगल शकुन दिला, हरदा येथील

प्रसिद्ध जमीनदार रा. रा. रघुनाथराव वामन केकरे - ज्यांचे घर श्रीमहाराजांच्या संचारक्रमांत पुनीत झालें, व महाराजांच्या प्रतिवार्षिक उत्सवप्रसंगांत व त्यांच्या भजनकीर्तनादि गजरांत जेथें सदोदित आनंदी आनंद भरून राहिला - त्यांनी चरित्र प्रकाशनार्थ ३०० तीनशें रुपयांची देणगी देऊन सहायक मंडळांत अग्रस्थान मिळविलें, त्यांचेच चिरंजीव रा. नारायणराव केकरे यांनी वर्षप्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर मुद्रणकार्यास आरंभ करवून सर्व प्रकारानें चरित्रप्रकाशकाचें उत्तम कर्तव्य बजाविलें, त्यांचे ज्येष्ठ बंधु रा. गणपतराव केकरे व सहाध्यायी रा. दिनुभाऊ गोखले यांनीही तत्परतेनें हातभार लावून चरित्रविषयक प्रेम व्यक्त केला, पुढें पुणें मुक्कामी मुद्रणकार्य चालू असतांना हरिभक्तिपरायण लक्ष्मणराव पांगारकर मुमुक्षुकर्ते यांनी चरित्राची हस्तलिखित प्रत वाचण्याची तसदी घेऊन पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या व चरित्राला प्रस्तावना लिहून महाराजांविषयी आपले निस्सीम प्रेम व्यक्त केलें, रा. रा. गणेश गोपाळ रांगणेकर यांनी स्वतःची अडचणीची परिस्थिति असतांही लेखकाला स्वकुटुंबीय समजून उत्तम बरदास्त राखली व रा. ज्ञानेश्वर उद्धव मांढरे यांनी उत्कट भक्तिभावानें शरीर झिजवून चरित्राची उत्कृष्ट सेवा केली; या सर्वांच्या उपकृतिपरंपरेंत लेखक प्रेमबद्ध आहे. तसेच ज्या प्रेमी मंडळींनी सक्रिय सहाय करून चरित्रमुद्रणकार्य यशस्वी केलें, त्याचेही अनंत उपकार आहेत व त्यांचा नामनिर्देश दुसरीकडे वेगळा केला आहे. आणखीही चरित्राची माहिती गोळा करण्याच्या प्रसंगांत पुष्कळ प्रेमळ मंडळीचें अंतःकरणपूर्वक सहाय झालेलें आहे. या सर्वांचाच लेखक समान ऋणी असून अशीच महाराजांची निरंतर सेवा घडविण्याबद्दल सर्वांचे कृपादान मागत आहे व स्थलाच्या व कालाच्या अडचणीमुळें ज्यांची नांवें प्रसिद्ध करतां आली नाहींत त्यांची क्षमा मागत आहे.

या सर्व मंडळींनीं आपल्या प्रेमाचा व प्रयत्नाचा प्रवाह श्रीमहाराजांच्या चरित्रभक्तीकडे वळवून त्याला जें आज दृश्य स्वरूप दिलें आहे ही परमात्म्याची उत्तम सेवा होय व परमात्मप्राप्तीचा हा निष्कंटक राजमार्ग होय. या विषयीं आरंभींचें पद्मपुराणांतील वचन व **'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्धधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः'** हें श्रीमद्भगवद्गीतेचें वचन प्रमाण आहे.

याच दिशेनें आपणा सर्वांनीं मिळून प्रयत्न चालू ठेवला व आपल्या स्वभावांत सद्‌गुणांची भर टाकीत राहिलों तर शुद्ध प्रेमाचा मार्ग आपल्यास अधिकाधिक स्पष्ट दिसत जाऊन, जसजसा आपल्या प्रेमाचा व प्रयत्नाचा वेग वाढत जाईल तसतसे आत्मसार्थकतेच्या सोपानांवर चढून सद्‌गुरुकृपाबलानें परमात्मरूपीं प्रेमाचें शिखर आपणांस सहज गांठतां येईल.

अशा योग्य प्रयत्नाचें अवलंबन करून प्रेमळ सज्जनवृंदांनी महाराजांच्या चरित्रपठणश्रवणानें कृतार्थ व्हावें व त्यांतील सद्बोधामृताचे यथेच्छ सेवन करून आपल्या इष्टमित्रांसह तृप्तीचा लाभ घ्यावा अशी प्रार्थना करून हा अल्प परिचय पुष्पपंकोलिकान्यायानें श्रीमहाराजमाउलीच्या चरणीं समर्पण करतो.

महाराजांचा अज्ञ बालक,

मिलिंद,

मु. पुणें, गणेशवसतिगृह, मिती गुरुपूर्णिमा, शके १८४१

इ.स.१९१९

समन्वयपीठाधीश्वर

दिव्यचक्षू श्रीगुलाबराव महाराज

शतशः प्रणिपात !
विदर्भातील
अलौकिक प्रतिभासंपन्न व्यक्तिविशेष !
नेत्र मिटून घेतलेले,
खेड्यात जन्मलेले,
अल्प आयुष्यात विशाल साहित्यसंपदा
निर्माण करणारे,
आध्यात्मिक क्षेत्राप्रमाणेच
प्रपंच विज्ञान संगीत इतिहासादी
अनेक आधुनिक ज्ञानक्षेत्रात
भविष्यातील भारतवर्षाला
विचारवैभव प्रदान करणारे,
''युक्तीने पटविण्याचा बाणा असलेले''
एकमेव बुद्धियोगी संत !
आद्य शंकराचार्यप्रणीत
केवलाद्वैत-दर्शनाचा उत्तरार्ध
असलेले
मधुराद्वैत-दर्शन
नव्याने प्रस्तुत करणारे आचार्य !
आळंदीपती श्रीज्ञानराजांनी
विश्वमांगल्यासाठी दिलेले
दुसरे पसायदान !
महर्षि वेदव्यासांचे स्मरण करून देणारी
सर्वस्पर्शी प्रज्ञा लाभलेले

सिद्ध-प्रज्ञेचेनि लाभे ।
मनचि सारस्वते दुभे ।
सकळ शास्त्रे स्वयंभे ।
निघती मुखे ॥

असा असाधारण अधिकार असलेले

सकळशास्त्रनिर्माते

! सिद्धप्रज्ञ !

१..वेद-द्रष्टा : समाधिस्थितीत वेदमंत्र पाहणारे.

२..वेद-श्रोता : समाधिस्थितीत वेदमंत्र ऐकणारे.

३..वेदमीमांसक :
वेदातील आन्तर्विरोध-समन्वयकर्ता

४..वेदांच्या अपौरुषेयत्वाची सिद्धी
योगसाधना आणि स्वानुभवाने करणारे

५..पुराणमीमांसक :
पुराणांवर सूत्रग्रंथ रचणारे

६..सूत्रकार ऋषी :
९ सूत्रग्रंथांची रचना केली.

७..आकरग्रंथ रचणारे :
संप्रदादायसुरतरू ग्रंथ लिहिला.

धर्माचार्य

८..धर्मसमन्वयाचे एकूण ९ प्रकार
सांगितले.

९..सर्व-धर्मांच्या उत्पत्तीची **मूल-प्रक्रिया**
सांगितली.

१०..**सर्वधर्मांचा पाया**
स्वानुभव घेऊन वर्णन केला.
रज-तम-नाश व सत्वगुणाची वृद्धी होणे,
हाच सर्व-धर्मांचा मूळ आधार असल्याचे दाखविले.

११..**'सर्व धर्म वैदिक धर्माच्या शाखा'**
हे सिद्ध केले.

१२..इस्लाम-ख्रिश्चनादींचे वैदिकधर्माशी साम्य दाखविले.

१३..**धर्मस्थापका**ची ४१ अपरिहार्य लक्षणे सांगीतली.

भक्ति-आचार्य

१४..देवर्षी नारदांच्या आज्ञेने भक्ती व धर्माच्या स्थापनेसाठी प्रत्येक कलियुगात अवतरतात.

१५..गोकुळातील महारासात आपल्या अनुग्रहितांना नेतात.

भाष्यकार आचार्य

१६..भागवत, सांख्य, योग, संतवचना वरील भाष्यकार.

१७..वेद-पुराण-धर्म-दर्शन-शास्त्रे व संतवचनांतील विरोध-परिहार करून समन्वय केला.

मधुराद्वैताचार्य

१८..'मधुराद्वैत-दर्शनाची नव्याने मांडणी केली.

१९..सगुण-साकार-मर्यादित भासणारा भगवंताचा देह पूर्ण सच्चिदानंदघन ब्रह्म असल्याचे सिद्ध केले.

२०..भगवद् विग्रहाला **'अनध्यस्तविवर्त'** ही नवी संज्ञा दिली.

२१..उपासना ज्ञानपूर्व असते व भक्ती ज्ञानोत्तर असते,हे समजावून दिले.

२२..'तत्वमसि' या महावाक्याने ज्ञान झाल्यानंतर भक्तीप्राप्तीचे विवेचन केले.

२३..**पराभक्ती म्ह.माधुर्यभक्ती**

* सर्वभाव समावेशक

* सर्वश्रेष्ठ

* विषयभावरहित असल्याचे दाखविले.

२४..**'तत् सुख सुखित्वा'**वर भक्तीची स्थिती असल्याचे स्पष्ट केले.

२५..सच्चिदानंदाच्या आनंदांशावर भक्ती स्थापिली.

२६..भक्तीचे १६ प्रकार सांगितले

*** उपासना :**

श्रवणापासून सख्यभक्तीपर्यंत ८ प्रकार.

***ज्ञानोत्तर-मध्यमाः**

आत्मनिवेदनापासून लालनापर्यंत.४ प्रकार.

*** पराभक्ती :** .

माधुर्यभक्तीचे संयोग २, वियोग २. प्रकार.

या १६ पैकी ७ नवे आहेत.

२७..परब्रह्माचे -

अस्फुरण म्हणजे **ज्ञान,**

स्फुरण म्हणजे **भक्ती,**

हे समजावून सांगितले.

सांख्यदर्शन : ५ ग्रंथ

२८..सेश्वर-सांख्याची सिद्धी केली

२९..सांख्य आणि **योग,** सांख्य आणि **वेदान्त,** परस्पर पूरक असल्याचे दाखवून समन्वय केला.

योगदर्शन

८ ग्रंथ व २५ पत्रे

३०..नवनवीन योगप्रक्रियांची निर्मिती केली.

३१..कुंडलिनी चक्रे,या संबंधी असलेला आधुनिकांचा भ्रम दूर केला.

३२..योगसाधनेतून वेदमंत्र ऐकण्याचा मार्ग दाखविला.

३३..नवीन योग-सूत्र-संहिता निर्मिती केली.

३४..मनाला अर्थाकडे एकाग्र केल्याने वेद आणि सर्व भाषा देखील समजतात, हा स्वानुभव सांगितला. (ऊहसिद्धी)

न्यायदर्शनातून विज्ञान

३५..न्यायाच्या प्रत्यक्षखंडातून विज्ञान-विकासाचे मार्गदर्शन केले.

३६..न्यायदर्शनप्रणीत विज्ञान

आस्तिक-नास्तिकांना एकीचे

आवाहन केले.

३७..सर्व लेखन अकाट्य न्यायघटित युक्तिवादाने केले.

३८..**पूर्वमीमांसा** :२ सूत्र ग्रंथ लिहिले.

आयुर्वेद : ९ ग्रंथ

३९..मानसायुर्वेदादि ८ ग्रंथ लिहिले.

४०..**'द्रव्य-गुणसिद्धांत'** नव्याने मांडला.

४१..ॲलोपथीचा **जंतुकारणवाद** खंडन केला.

४२..**मनोविकार-कारणवाद** सिद्ध केला.

४३..कोणत्या मनोविकारांपासून कोणते रोग होतात?

४४..कोणत्या रोगांपासून कोणते विकार होतात? यांचे स्पष्टीकरण केले.

शिक्षण

४५..**'सुसंस्कारांचे दान म्ह.शिक्षण'** अशी सारभूत व्याख्या केली.

४६..शिष्यांवर अपार प्रेम केले.

४७..शिष्याचा अवमान सहन केले नाही.

४८..मंगलाचरणात आपल्या शिष्यांना स्थान देणारे **पहिले महापुरुष.!**

संगीत २ ग्रंथ

४९..संगीतशास्त्र निर्माण केले.

५०..**संगीत-चतुष्टय** सांगितले. राग-ताल- स्वर व अर्थ.

५१..गानसोपानात मार्गी (वैदिक) संगीत व देशी संगीत यांची आजही असलेली उपयोगिता दाखविली.

५२..देशी-संत-संगीताला मार्गी-वैदिक संगीताचा दर्जा असल्याचे दाखवून दिले.

५३..नवीन १२८ वृत्त-रचना केली.

५४..नवीन छंद-रचना केली.

५५..पं.भातखंडें यांनी 'प्राचीन महर्षींची केलेली अवहेलना मोडून काढली.

५६..आधुनिक संगीताच्या समस्यांचे संदर्भ लक्षात घेऊन 'गानसोपान' लिहिला.

काव्यशास्त्रीय सूत्रग्रंथ

५७..नवी काव्यसूत्रसंहिता निर्माण केली.

श्रीगुलाबरावमहाराज स्वतः

५८..कवी होते,

५९..**काव्यज्ञ** होते,

६०..**गायक** होते,

६१..**काव्यशास्त्र-निर्माते** होते.

भाषा

६२..त्रि-भाषासूत्र : संस्कृत - स्वभाषा - राजभाषा शिकण्याचा आग्रह होता.

६३..नवी **नावंग भाषा** निर्मिली.

६४..नावंगभाषेचे **व्याकरण-निर्माते** होते.

६५..**लिपी-निर्माते** : सांकेतिक-लघु-लिपी.

६६..भाषेतील दोष वर्णन केले.

६७..**नव-शब्द निर्माते** होते.

६८..इंग्रजी शब्दांना **पर्याय-शब्द** तात्काळ सांगत.

६९..संस्कृतात ११ **पत्रे** लिहिलीत.

७०..संस्कृतात ४१ गेय **पदे** रचलीत.

७१..संस्कृतात **स्तोत्रे** रचली.

७२..संस्कृतात **कीर्तन** करीत.

क्रीडा

७३..खेळातून परमार्थ साधना. उपनिषदादी शास्त्रीय आधाराने **मोक्षपट** निर्माण केला.(साप-शिडीचा खेळ)

मनो विज्ञान

७४..मानसशास्त्राला वेगळी दृष्टी दिली.

७५..मनोविज्ञातून परमार्थ मार्ग दाखविला.

७६..मानस-शक्तीचा अनुभव दाखविला.

७७..भारतीय मनोविज्ञान व पाश्चात्य मतांचे तौलनिक मूल्यमापन केले.

बुवाबाजी

७८..चमत्कारांचा निषेध करीत.

७९..बुवाबाजीचा दंभस्फोट करीत.

८०..ढोंगी साधूंना करावयाच्या प्रश्नांचा ग्रंथ **'प्रश्नकदंब'** ग्रंथ निर्माण केला.

८१..अमानित्व' बाणण्यासाठी स्वतःचा अपमान करवून घेत.

८२..लोकांची गर्दी होतांच निघून जात.

इतिहास

८३..इतिहासाला नवी दृष्टी दिली.

८४.. * इतिहास कोणी लिहावा?

८५.. * कसा लिहावा?

८६.. * कोणावर विश्वास ठेवावा? याचे मार्गदर्शन केले.

८७.. स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास कां शिकावा? याचे मर्म सांगितले.

आर्य-संकल्पना

८८.. **आर्य**-शब्दाचा अर्थ - **सुसंस्कृत मनुष्य** एवढाच आहे, **वंशवाचक नाही,** हे सिद्ध केले.

८९.. आर्य बाहेरून भारतात आले किंवा भारतातून बाहेर गेले, या दोन्ही मतांचे खंडन केले.

९०..विश्वव्यापक आर्यसंस्कृतीला पुरावे दिले.

९१..तीन हजार वर्षापूर्वी सर्व जगात - एक आर्य संस्कृतीच होती, हे सप्रमाण सिद्ध केले.

९२..सर्व जगातील प्राचीन पुराव्यांवरून -
*युरोपातून आर्य भारतात आले आणि
* भारतातून आर्य भारताबाहेर गेले असे म्हणतात. पण -
* **श्रीगुलाबरावमहाराज म्हणतात** की-
* जगात सांपडणारे सर्व प्राचीन पुरावे आर्य संस्कृतीचेच आहेत. कारण-
* ३०००वर्षापूर्वी सर्व जगात आर्यच होते,
* हे ऐतिहासिक सत्य आहे.

९३.. शूद्रवर्ण आर्यांचाच भाग असल्याचे प्रमाणित केले.

९४..हिंदुसंस्कृतीचे विकृतीकरण संपवण्यासाठी मार्गदर्शन केले..

विज्ञान

९५..आधुनिक विज्ञानाला नवी दृष्टी दिली.

९६..न्यायशास्त्रानुसार विज्ञानात शोध कसे लावावेत, याचे मार्गदर्शन केले.

९७..आधुनिक शास्त्रांचे मूळ भारतीय आहे, हे दाखविण्यासाठी **''वैदिक-प्रमाण-पुरस्सर''** ग्रंथ कसे असावेत याचे मार्गदर्शन केले.

९८..डोळे मिटलेले असूनही भारतीयांचे अथांग विचार-वैभव आपल्या ग्रंथसंपदेतून प्रगट केले.

विश्वोत्पत्तीची वैदान्तिक प्रक्रिया

९९..**ब्रह्मवृत्ति-स्फुरणातून विश्वोत्पत्ती.** मूलभूत विश्वनिर्मितीची प्रक्रिया प्रगट केली.

१००..ब्रह्मवृत्तिस्फुरणाची परिणती अखेरीस पृथ्वीतत्त्वात व शेवटी सगुण-साकार-विग्रह **''अनध्यस्त-विवर्ता''** पर्यंत नेली.

पाश्चात्य मतांची समीक्षा

१०१.. **ॲटम्-थियरीचे** खंडन केले.

१०२..**डार्विनच्या** उत्क्रांतिवादाचा अपुरेपणा दाखवून दिला.

१०३..**स्पेन्सरच्या** संशयवादाचे खंडन केले.

१०४..**थियॉसफीचे** खंडन केले.

१०५..**मायर्सची** समीक्षा केली.

१०६..**नास्तिकवादाचे** खंडन केले.

१०७..**जडत्वाचे खंडन** करून **सर्व-चेतनत्व** सिद्ध केले.

नीतिशास्त्र

१०८.. परकीय व भारतीय नीतीचे मूल्यमापन केले.

१०९..बेकन,ॲनीबेझंट,प्लेटो इ.अनेकांचे खंडन केले.

कीर्तन

११०..कीर्तनात पूर्वरंग व उत्तर रंग कसे असावेत, हे सांगितले.

१११..अभंग ७ व पदे१८ आख्याने रचली.

११२..संस्कृतातही कीर्तन करीत.

११३..लोकगीतकार तुंबडी, सयनाजी, स्त्रीगीते रचलीत.

११४..लावणीकार : ७७ लावण्या

११५..नाटक लिहिले.

११६..आत्मचरित्र लिहिले.

११७..लोक-शिक्षण दिले.

११८..स्त्री-शिक्षण दिले.

११९..बाल-शिक्षण दिले.

व्यक्ति-विशेष

१२०..संस्कृत- मराठी- वऱ्हाडी- हिंदी आणि व्रजभाषेत ग्रंथलेखन केले.

१२१..चवथ्या वर्षापासूनच **कृष्ण-साक्षात्कार** होता.

१२२.. बाराव्या वर्षापासून **समाधिसुख** अनुभवत.

महाराजांची नामे

१२३..व्यावहारिक- **गुलाबरावमहाराज**

१२४..नाथसंप्रदाय- **पाण्डुरंगनाथ**

१२५..अभंगमुद्रा- **ज्ञानेश्वरकन्या**

१२६..रासमंडळ- **पंचलतिका**

इतर संबोधने

१२७..मधुराद्वैताचार्य

१२८..सर्व धर्म समन्वयपीठाधीश्वर

१२९.. समन्वय महर्षी

१३०..योगपीठाधीश

१३१..भक्त्याचार्य

१३२..दार्शनिक

१३३..दिव्यचक्षू

१३४..प्रज्ञाचक्षू

१३५..अन्तश्चक्षू

महाराजांची मानसिकता

१३६..शरीराने पुरुष **: कर्तव्य-कठोर.**

१३७..मनोभावाने स्त्री **: अति कोमल.**

१३८..ज्ञानेशकन्या-कृष्णपत्नीत्वाने **: भाव-विवश.**

१३९..शास्त्रीय खंडन-मंडन करताना **: तर्क-कर्कष.**

१४०..वडीलधाऱ्यांशी वागत असता **: पुत्रवत् नम्र.**

१४१..चुकीचे वागणाऱ्यांना **: कठोर.**

१४२..आर्य-विचार निकृष्ट ठरविणाऱ्यांना **: सडेतोड.**

१४३..भारतीयांनी स्वयंला जाणून घ्यावे, सत्वसंपन्न आणि समर्थ व्हावे,म्हणून अशा वरील प्रकारची योजना करीत.

१४४..यासाठी आपल्या अल्प जीवनात, स्वप्रकृतीकडे लक्ष न देता, अपार कष्ट सहन केले.

१४५. स्वतः सर्वज्ञ असूनही, लोकांना समजावून देण्यासाठी -

स्वतःच्या डोक्यावर पुस्तकांची पेटी घेऊन गावोगांव फिरणारे एकमेव संत !

पत्नीप्रेम

१४६..वैराग्यसंपन्न आणि ब्रह्मज्ञानसंपन्न संत असूनही महाराजांनी पत्नी मनकर्णिकेवर **अपार प्रेम** केले.

१४७..विवाहाचे वेळी **परमार्थाची शपथ** घेवविली.

१४८..**लिहिणेवाचणे** तर शिकविलेच पण भागवतही सहज समजेल, एवढी **संस्कृताची तयारी** करून दिली.

१४९..भक्तिरसाने ओथंबलेल्या आपल्या गायनात सहज एकरूप होईल अशी **स्वरसाधना** बहाल केली.

१५०..लौकिक पुत्रमोहातून विलक्षण रीतीने सोडविले. आणि अलौकिक **वैराग्य** आणि अपार **भक्तिप्रेम** प्रदान केले.

१५१..सौ.मनकर्णिका ब्रह्मस्थानी प्रस्थान करती झाली आणि-

१५२ श्रीमहाराजांच्या हृदयातून 'विरहगीत' पाझरले.

महाराजांच्या अंतरातील गुलाब-प्रेम-परागाचा सौरभ सर्वत्र दरवळला.

१५३..पण हा **'पत्नी प्रेम पराग'** 'विषय-राग' नव्हे.

ही परतत्वस्पर्शाने ओथंबलेली **परमप्रेमरूपा अमृतवर्षा** आहे. हा **विरह प्रेमाचा मधुरतम आविष्कार** आहे !

१५४..वैराग्यसंपन्न संतमालिकेत कोठेही न आढळणारा हा विरह-विलाप

जागतिक साहित्यात एकुलता एक आहे.

विविध साहित्य संपदा

१५५..अभंग रचना - २१२३

१५६..पद रचना - २२४४

(राग-ताल-चालीसह)

संस्कृत पदे -४१

हिंदी पदे - ३०४

१५७..श्लोक - १०००

(संस्कृत / मराठी)

१५८.. ओवीसंख्या - २३०००

१५९..गद्य व पद्य पत्रे - ११८

संस्कृत पत्रे -११

योगपत्रे - २५

१६०..उपलब्ध ग्रंथसंख्या - १४०

संस्कृत - ३२.

हिंदी - २.

१६१.. मुद्रित पृष्ठसंख्या - ७०००

(इहलोक-निवास : आषाढशुद्धदशमी.६.जुलै.१८८१ ते २०-सप्टें१९१५/भाद्रपदवामनद्वादशी)

मंगलाचरण

श्रीगुलाबरावमहाराजांनी कोणतेहि सांप्रदायिक कार्य करताना प्रथम उपास्यपंचकाला व शिष्यपंचकाला नमन करण्याचा **''अनिवार्य दंडक''** घालून दिला आहे.॰

नमः श्री आदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे । गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ॥१॥ परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंदविग्रहम् । ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ॥२॥ ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः। सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥३॥ यद्वस्तुतस्सच्चिदकापकारी भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् । ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे बिभ्राजते तन्मुनयोर्विशन्ति ॥ कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षस्थले कौस्तुभम् । नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणुः करे कंकणम् । सर्वांगे हरिचंदनं सुललितं कंठे च मुक्तावलिः। गोपस्त्रीपरिवेष्टितो विजयते गोपालचूडामणिः॥५॥ वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः। यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥६॥ श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य, उमा माता, शिवः पिता । पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥७॥ पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च । नमस्कृत्वा च याचेऽहं ज्ञानेश्वरसुतानुतिम् ॥८॥

ॐ नारायणाय नमः ॐ ॥ ॐ हरये नमः ॐ ॥
ॐ दत्तात्रेयाय नमः ॐ ॥ ॐ व्यंकटेशाय नमः ॐ ॥
ॐ लक्ष्मणाय नमः ॐ ॥
वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥९॥

नमो अन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादि पालकेभ्यः नमः श्रीसच्चिदानन्दमात्रैक तनुधारिणे श्रीपांडुरंगनाथाय नतः क्षेमकराय च ॥ संसारांबुधिनिमग्नानां लीलयोद्धारणाय वै । स्फुटीकृतं भक्तितत्त्वं भक्तेश्चालंबनं तथा ॥१०॥ गुरुभक्तिस्वरूपाय विशुद्धं ज्ञानमूर्तये । भक्तिमार्गप्रदीपाय स्कंददासाय ते नमः ॥११॥